# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण
## Maharashtra Water Resources Regulatory Authority

9th Floor, Centre – 1 World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai – 400005. Tel.2215 2019 Fax 2215 3765 Email: mwrra@mwrra.org

### राज्यात खोल विहिरी खोदण्यास प्रतिबंध करण्याबाबत प्राप्त झालेल्या सुचना व त्या संबंधी अभिप्राय

| अ. क्र. | निवेदन दिलेल्या संस्थेचे नांव | संस्थेने उपस्थित केलेले मुद्दे /सूचना | मजनिप्राचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १.<br><br>२. | महाराष्ट्र राज्य इरिगेशन फेडरेशन, कोल्हापूर<br><br>व<br><br>सहयाद्री सहकारी साखर कारखाना लि., यशवंतनगर, ता.कराड, जि.सातारा | १. जलपातळी सर्वेक्षण ज्या एजन्सीकडून केले आहे त्यासंबंधी लोकप्रतिनिधी शासकीय अधिकारी शेतकरी प्रतिनिधी, सहकारी पाणी पुरवठा संस्था व शेतकरी यांच्याशी विचारविनिमय होणे गरजेचे आहे. | भूजल पातळीच्या अभ्यासाच्या अनुषंगानेच अहवाल यंत्रणेव्दारे विविध माध्यमातून प्रसिध्द केले जातात. |
| | | २. ज्या भागातील जमिनी क्षारपड झाल्या आहेत, अशा परिसरातील भाग ६० मीटर पेक्षा जास्त खोल विंधन विहिरींसाठी वगळण्यात यावा. | कायद्यातील कलम ४ नुसार भूजलदृष्टया अतिशोषित क्षेत्र व गुणवत्ता बाधीत क्षेत्र अधिसूचित करणेपूर्वी उपभोक्त्याची मते जाणून घेण्याची तरतूद असून त्यानुसार राज्य भूजल प्राधिकरणाकडून त्याची पूर्तता केली जाणे अपेक्षित आहे. |
| | | ३. क्षारपड झालेल्या जमिनींच्या परिसरातील ओढे-नाले यांचे रुंदीकरण व्हावे | क्षारपड क्षेत्र अधिसूचित झाल्यावर कायद्यातील कलम ६व ८ आदि सर्व तरतुदी लागू होणार आहेत. |
| | | ४. यापूर्वी राज्य शासनाने डार्क वॉटरशेड नावाखाली काही गावातील विहिरींना महावितरणमार्फत विद्युत कनक्शन न देण्याचा आदेश केला होता, तशी वेळ येऊ नये. | अधिसूचित क्षेत्रात नवीन विहिरींच्या खोदकामासाठी विशेष तरतूद कलम ३२ मध्ये करण्यात आलेली आहे. |

| अ. क्र. | निवेदन दिलेल्या संस्थेचे नांव | संस्थेने उपस्थित केलेले मुद्दे /सूचना | मजनिप्राचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| ३. | भामा कन्सल्टंशी सर्व्हिसेस,फ्लॅट नं.३०,पंतग प्लाझा, फेज ६, भारती विद्यापीठ, पुणे | १.वैधानिकता :- भारतीय राज्य घटनेच्या कलम १४ नुसार प्रत्येक भारतीय नागरिकास मालमत्तेच्या मालकीचा मुलभूत हक्क प्रदान करण्यात आला आहे. या प्रस्तावानुसार त्यासंबंधीत निर्बंधित पाणलोट क्षेत्रातील शेतक-यांच्या मुलभूत हक्कांचा भंग होतो व पर्यायाने उपरोक्त निर्णय अवैध ठरतो. | भूजल ही सामुदायिक संपत्ती असल्याने कोकाकोला प्रकरणामध्ये मा. केरळा न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार सर्व उपभोक्त्यांचे हक्क अबाधित राहतील व शासनाने पालकत्वाची जबाबदारी पार पाडणे अपेक्षित असल्याने कायद्यातील कलम २९, ३२ मध्ये समयोचित तरतूदी आहेत. |
| | | २. हानीपूरक पूरक भरपाई:- हा निर्णय संबंधित शेतक-यांच्या उदरनिर्वाहाचा एकमेव स्त्रोत संपुष्टात आणतो. त्यामुळे शेतक-यास आवश्यक हानीपूरक नुकसानभरपाई मिळणे हा त्याचा मुलभूत हक्क ठरतो. तथापि, अशी हानीपूरक भरपाई देण्याची तरतूद भूजल कायद्यांतर्गत समाविष्ट नाही. | कलम २७ मध्ये विहीर तात्पुरती बंद करण्याचे आदेश काढल्यास नुकसान भरपाई देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. |
| | | ३. पर्यायी उपयोजन :- पाणलोट/जलसंधारण कार्यक्रमाचे प्राप्त झालेले फलित याबाबत महाराष्ट्र राज्याची गतीशील भूजल संपत्ती (२०११-१२) अहवाल भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने प्रसिध्द केला आहे. त्या अहवालातील परिच्छेद ५.४.२ नुसार सामायिक/सामुदायिक तत्वावरील पाणलोट जलसंधारण कार्यप्रणालीच्या स्वतःच्या काही मर्यादा असल्यामुळे भूजलाच्या पुनर्भरणाचा व शेतक-यांचा प्रश्न सुटलेला नाही. | कलम ९(१०) नुसार विविध स्तरावर अंमलबजावणीत आणलेल्या उत्तम प्रथांना नवनवीन कार्यक्रमांना उत्तेजन व प्रोत्साहन देण्याची तरतूद उपलब्ध आहे. त्यात पर्याय उपयोजना या मुद्याचा विचार करणे शक्य आहे. |
| ४. | वॅाटर सोर्स टेक्नॉलॉजिस प्रा.लि., केदार एम्पॉयर, एस.एन.डी.टी. कॉलेजसमोर, पुणे-३८ | **1.**महाराष्ट्र भूजल अधिनियम २००९ ची अंमलबजावणी होण्याबाबत दुमत नाही. तथापि, त्यामधील विविध तरतुदींची अंमलबजावणी करण्याआधी अतिशोषित व शोषित पाणलोट क्षेत्रे अधिसूचित करणे, जिल्हा प्राधिका-यांची नेमणूक होणे, जिल्हा पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन समिती स्थापणे, राज्यातील विहिर मालकांची नोंदणी करणे, भूजलाच्या कृत्रिम पुनर्भरणासाठी योग्य क्षेत्रांची निवड करणे, मूळ पाणलोट क्षेत्रे निर्धारित करणे इत्यादी तरतुदींची पूर्तता होणे आवश्यक वाटते. | कायदा १ जून २०१४ पासून अंमलात आलेला असला तरी, त्या अंतर्गत करण्यात येणा-या तरतुदींची अंमलबजावणी टप्प्या-टप्प्याने करणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे कायदा हा अधिक लोकाभिमुख असेल व उपभोक्त्यांच्या सहकार्याने अंमलबजावणीत आणावयाचा असल्याने त्याच्या क्षमता बांधणीचे काम करुनच कायद्याची अंमलबजावणी करणे इष्ट राहणार आहे.<br><br>कृत्रिम भूजल पुरर्भरणासाठी पुनर्भरण योग्य क्षेत्र कलम ९(१) नुसार निर्धारित करण्याची तरतूद आहे. कायद्यांतर्गत कलम ४१ नुसार राज्यातील पाणलोट क्षेत्र निर्धारित करुन अधिसूचित करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर |

| अ. क्र. | निवेदन दिलेल्या संस्थेचे नांव | संस्थेने उपस्थित केलेले मुद्दे /सूचना | मजनिप्राचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| | | | आहे. |
| | | २.भूजलाचा उपसा करण्यावर मर्यादा आहेत. भूजलाचे मूल्यांकन (अंदाज) करताना झालेल्या निव्वळ भूजल भरणापैकी ७० टक्के भूजलाची उपलब्धता गृहित धरावयास पाहिजे व उर्वरित ३० टक्के भूजल विचारात घेऊ नये. | भूजल उपलब्धता व वापराचा तपशील काढताना केंद्र शासनाने निश्चित करुन दिलेल्या भूजल अंदाज समिती १९९७ च्या मार्गदर्शक तत्वांचा अवलंब केला जात आहे. भूजल अंदाजाचा अभ्यास करण्याचे काम केंद्र शासनाचे निर्देशाप्रमाणे केले जात असल्याने त्यामध्ये बदल सुचवावयाचे झाल्यास ते केंद्रिय पातळीवरील समितीमार्फत केले जाणे अपेक्षित आहे. त्यामुळे संबंधितांनी भूजल अंदाजाचा अभ्यास सुधारित करण्यास सुचविण्यात आलेले मुद्दे राज्य भूजल प्राधिकरण पातळीवरुन अभ्यास करुन व योग्य वाटल्यास केंद्र शासनाच्या समितीस विचारार्थ पाठविण्याची शक्यता तपासून पाहता येईल. |
| | | ३. १.अतिशोषित व शोषित पाणलोट क्षेत्रनिहाय निरिक्षणे :<br>२.मागील ४ भूजल मूल्यांकन अहवालातील पाणलोट क्षेत्रांच्या वर्गवारीत होणारा बदल.<br>३ सन २००९-१० व २०११-१२ च्या भूजल मुल्यांकनात काही पाणलोट क्षेत्रात बोरवेलची संख्या कमी/जास्त होणे<br>४. भूजल मूल्यांकन अहवालामध्ये पाणलोट क्षेत्रनिहाय पर्जन्यमानातील चढ-उतार याचा विचार. | पाणलोट क्षेत्रनिहाय उपस्थित केलेल्या मुद्यांचा तपशील भूजल अंदाज अहवाल अंतिम करीत असतांना स्थापन केलेल्या समितीसमोर विचारार्थ ठेवणे योग्य राहील |
| | | ४. संस्थेचे निष्कर्ष :- गोळा केलेल्या माहितीमध्ये, माहितीच्या पृथ:करणामध्ये आणि तरतुदींच्या अंमलबजावणीमध्ये पारदर्शकता असावी. अतिशोषित व शोषित पाणलोट क्षेत्रात कृत्रिम पूनर्भरण योजना प्राधान्याने राबवाव्या, पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीच्या मंजुरीशिवाय तरतुदींची अंमलबजावणी टाळावी इत्यादी. | संस्थेने दिलेल्या मुद्दा क्र.१३ मधील अभिप्रायाचा अंतर्भाव कायद्यांतर्गत विविध तरतुदीमध्ये समाविष्ट असून तपशिलातील मुद्यांचा विचार नियम, तरतूद करतांना करणे संयुक्तिक राहील. |